# सन 2025
# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

*माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (ख) (एक) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाशी संबंधित रचना कार्य, व कर्तव्य यांचा तपशिल

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव | शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित,नाशिक | |
| २ | पत्ता | तीसरा मजला, "आदिवासी विकास भवन" राम गणेश गडकरी चौक, जुना मुंबई- आग्रा रोड, नाशिक- ४२२ ००२ | |
| ३ | कार्यालय / विभाग प्रमुख | व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक (प्रशासन), महाव्यवस्थापक (वित्त), | |
| ४ | शासकिय विभागाचे नाव | आदिवासी विकास विभाग | |
| ५ | कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनस्त | आदिवासी विकास विभाग | |
| ६ | कार्यक्षेत्र | संपुर्ण महाराष्ट्र | संपुर्ण महाराष्ट्र कार्यानुरुप |
| ७ | विशिष्ट काम | शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत व राआदिवासी बांधवांसाठी स्वयंरोजगाराच्या कर्ज योजना राबविणे. तसेच आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कृषी, पशुधन, मत्स्यपालन, मधुमक्षीकापालन तसेच वनौपज आधारीत आदिवासींचे उपजिविका वृद्धीसाठी विविध योजना राबविणे. | |
| ८ | विभागाचे ध्येय/धोरण | अ) अनुसुचित जमातीच्या व्यक्तीच्या आर्थिक विकासासाठी व कल्याणासाठी स्वतःच्या जबाबदारीवर किंवा सरकार, संवैधानिक संस्था, कंपन्या, भागिदारी संस्था, व्यक्ती यांच्या सहयोगाने किंवा अशा संघटना, अभिकरणे यांच्या मार्फत कृषी उद्योग, लघु उद्योग, वाहतुक, वैद्यकीय, अभियांत्रिकी सारखा इतर धंदा/व्यवसाय, व्यापार किंवा कार्यालय यांच्या माध्यामातुन योजना आखणे, प्रचलित करणे. मदत करणे, सल्ला देणे, सहाय्य करणे, वित्तीय सहाय्य देणे, संरक्षण देणे आणि विविध उपक्रम हाती घेणे.<br>ब) आर्थिक स्थिती / पध्दती आणि उत्पादन निर्मिती, व्यवस्थापन आणि विपणन यांच्या तंत्राचा विकास करण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यात अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस समर्थ बनविण्यासाठी कामधंदा, व्यवसाय, व्यापार किंवा कार्य चालु करण्यासाठी भांडवल कर्ज मिळविण्याची साधने समुग्री आणि तांत्रिक व्यवस्थापकीय सहाय्य देण्याची तरतूद करणे.<br>क) वरील व्यतिरिक्त आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठी योग्य ते आवश्यक वाटणारे इतर कार्य करणे. | |
| ९ | धोरण | - | |
| १० | सर्व संबधित कर्मचारी | स्वतंत्र तक्ता कलम ४ (१) (ब) (ix) | |
| ११ | कार्यक्षेत्र | संपुर्ण महाराष्ट्र | संपुर्ण महाराष्ट्र कार्यानुरुप |
| १२ | कामाचे विस्तृत स्वरुप | | |
| १३ | मालमत्तेचा तपशिल | - | |
| १४ | उपलब्ध सेवा | | |
| १५ | संस्थेचा सरचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचे प्रत्येक स्तरावरचे तपशिल | आदिवासी विकास विभाग अखत्यारीतील कार्यक्षेत्रात विकास विषयक कामांचा अंमलबजावणी. | |
| १६ | कार्यालयीन दुरध्वनी व वेळा | ०२५३-२३१५८६० वेळ सकाळी .०९.४५ ते सायंकाळी ०६.१५ | |
| १७ | साप्ताहिक सुट्टी व विविष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळा | शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार | |

Scanned with OKEN Scanner

## सन 2025
## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**कलम — ४ (१) (ख) (दोन)** - शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधिकरणांतील अधिकारी कर्मचारी यांचे कर्तव्य /

### प्रशासन विभाग

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचारी नाव व पदनाम | नेमुण दिलेल्या कार्यालयीन कामकाजाचे विषय |
|---|---|---|
| 1. | श्री.निलेश भ.खोंडे, उपव्यवस्थापक तथा प्र.व्यवस्थापक (प्रकल्प) | शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक अंतर्गत राबविण्यांत येणाऱ्या विविध योजनांचे संनियंत्रण तसेच तसेच दैनंदिन कार्यालयीन कामकाज करणे व वरिष्ठांच्या सुचनेनुसार संबंधित कार्यक्षेत्रात कार्यालयीन कामकाजानिमित्त दौरे करणे / भेटी देणे.<br>केंद्र शासन व राज्य शासन योजना, प्रशासन / आस्थापना विषयक सर्व कामकाज, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविलेल्या योजनांचे क्षेत्रिय दौरे करुन वरिष्ठांना अहवाल सादर करणे. मुल्यमापन, संनियंत्रण, क्षेत्रिय भेटी, वेळोवेळी आढावा बैठकीची माहिती तयार करणे, झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे. तसेच योजनेशी संबंधीत माहिती व उपयोगिता प्रमाणपत्र वेब पोर्टल वर अपलोड करणे. |
| 2. | श्रीमती स्वप्नाली नितीन पाटील, वरीष्ठ सहाय्यक | शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक येथील प्रशासकीय / आस्थापना विषयक संपुर्ण कामकाज, एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना विषयक कामकाज तसेच दैनंदिन कार्यालयीन कामकाज करणे.<br><u>प्रकल्प योजना (एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना)</u><br>१. राज्यशासन, केंद्रशासन व शाखा कार्यालयांशी करावयाचा कर्ज योजनाविषयक पत्रव्यवहार.<br>२. योजनाची अद्यावत माहीती /अहवाल व त्या अनुषंगाने होणारा पत्र व्यवहार.<br>३. कर्ज मंजुरी आदेश, पुरवठा आदेश, निधी वर्ग नस्ती व देयके तपासुन सादर करणे.<br>४. कोर्ट केस / खाते चौकशी पत्र पत्रव्यवहार.<br>५. N.S.T.F.D.C पत्र व्यवहार.<br>६. भाग भांडवल व A.G. पत्रव्यवहार.<br>७. सार्वजनिक उपक्रम समिती व वाणिज्यिक अहवाल.<br>८. के.आर.ए.अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र.<br>९. दैनंदिन कार्यालयीन कामकाज.<br>१०.कंपनी कायद्याच्या अनुषंगिक कामकाज करणे.<br>११.स्टॅण्ड अप योजना विषयक कामकाज.<br><u>आस्थापना</u><br>१. राज्यशासन, केंद्रशासन व शाखा कार्यालयांशी करावयाचा आस्थापनाविषयक पत्रव्यवहार.<br>२. कर्मचा-यांचे आस्थापना विषयक सर्व बाबी.<br>३. सेवापुस्तके अद्यावत करणे.<br>४. बिंदुनामावली तयार करणे. |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | | ५. सेवाजेष्ठता यादी तयार करणे.<br>६. माहीतीचा अधिकार अधिनियम २००५ बाबत पत्रव्यवहार.<br>७. विविध संघटनांकडून प्राप्त पत्रव्यवहार.<br>८. कार्यालयीन स्टेशनरी निविदा व इतर खरेदी.<br>९. किरकोळ खर्च देयके सादर करणे.<br>१०. विधानसभा तारांकित/अतारांकीत प्रश्न पत्रव्यवहार.<br>११. संचालक मंडळ व शाखा व्यवस्थापक व इतर सभा विषयक कामकाज.<br>१२. बाहययंत्रणेद्वारे नियुक्त कर्मचाऱ्याशी संबंधीत सर्व बाबी.<br>१३. कार्यालयीन नुतनीकरण / दुरुस्ती / कार्यालयीन खर्च विषयक सर्व बाबी.<br>१४. मानधन तत्वावरील नियुक्त कर्मचाऱ्यांशी संबंधीत सर्व बाबी.<br>१५. कर्मचाऱ्यांचे वैद्यकिय देयके.<br>१६. कर्मचाऱ्यांचे रजा विषयक सर्व बाबी. (किरकोळ रजा, अर्जित रजा, परावर्तीत रजा इ.)<br>१७. कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ, वेतननिश्चिती, आश्वासित प्रगति योजना, वेतन आयोग इ.सर्व बाबी.<br>१८. कर्मचाऱ्यांचे उपस्थिती दाखले.<br>१९. खर्च देयके सादर करणे.<br>२०. GeM पोर्टलवरुन खरेदी विषयक सर्व बाबी.<br>२१. आपले सरकार पोर्टल वरील तक्रारी बाबत कामकाज.<br>२२. अनुसूचित जमाती कल्याण समिती दौरे विषयक सर्व कामकाज.<br>२३. शासनाकडून वेळोवळी मागविण्यात येणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने कामकाज.<br>२४. वरिष्ठांचे निर्देशानुसार सर्व कामकाज. |
| | **<u>वित्त विभाग</u>** | |
| १. | श्रीमती धनश्री निलेश बऱ्हाटे<br>लेखापाल | शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक येथील लेखाविषयक संपूर्ण कामकाज करणे.<br>१) प्रशासन व प्रकल्प विभागाकडुन वित्त विभागाकडे पडताळणीसाठी सादर होणाऱ्या नस्ती तपासणे व अभिप्राय देवुन सदरच्या नस्तीवर कार्यवाही करणे.<br>**२) व्यवस्थापकीय अनुदान -**<br>१) व्यवस्थापकीय अनुदानाचा प्रस्ताव तयार करुन मंजुरीसाठी शासनास सादर करणे.<br>२) शबरी महामंडळासाठी वेतन व भत्त्यांसाठी वेळोवेळी शासनास व्यवस्थापकीय अनुदानाची मागणी करणे, तसेच व्यवस्थापकीय अनुदानाबाबत प्राप्त, खर्च व शिल्लक यांचा तपशिल ठेवणे.<br>३) व्यवस्थापकीय अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे.<br><br>**३) वेतनासंबंधिचे कामकाज-**<br>१) अधिकारी व कर्मचारी यांची वेतन अदायगी नस्ती तयार करणे.<br>२) अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनातुन केलेल्या कपाती -<br>PT, Income Tax, CPF यांचा विहीत मुदतीत<br>शासनास भरणा करणे.<br>३) अधिकारी व कर्मचारी यांच्या पगार स्लिप तयार करणे.<br><br>४) वित्त विभागास अदायगीसाठी सादर झालेल्या देयकांतुन नियमानुसार आयकराची कपात करुन सदरच्या आयकराचा विहीत मुदतीत शासनास भरणा करणे.<br>५) प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरवातीस दरपत्रके मागवुन महामंडळाच्या कर सल्लागाराची |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | | नियुक्ती करणेबाबतचे सर्व कामकाज करणे.<br>६) प्रत्येक तिमाही नंतर सात दिवसांच्या आत महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांचा वेतन भत्यांचा तपशिल संपुर्ण कपातीसह तसेच शासनास भरलेल्या सर्व करांच्या चलनासह फॉर्म नं.२४Q चे आयकर रिटर्न सादर करणेसाठी महामंडळासाठी नियुक्त झालेल्या कर सल्लागार यांचेकडे सादर करणे.<br>७) प्रत्येक तिमाही नंतर सात दिवसांच्या आत महामंडळाकडुन व्यापारी यांना अदायगी केलेल्या देयकांचा तपशिल संपुर्ण कपातीसह तसेच शासनास भरलेल्या सर्व करांच्या चलनासह फॉर्म नं.२६Q चे आयकर रिटर्न सादर<br>करणेसाठी महामंडळासाठी नियुक्त झालेल्या कर सल्लागार यांचेकडे सादर करणे.<br>८) शाखा कार्यालयांकडुन दरमहा जमा होणारी वसुली बाबत सर्व तपशिल ठेवुन सदरच्या वसुलीची रक्कम NSTFDC, New Delhi यांचेकडे पाठविणे.<br>९) प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी NSTFDC, New Delhi यांचेसोबत वर्षभरातील झ ालेल्या सर्व नोंदी ठेवुन Reconcilation मांडणे व ते NSTFDC, New Delhi यांना पाठविणे.<br>१०) प्रत्येक आर्थिक वर्षात ३० सप्टेबर व ३१ मार्च अखेरील एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेसोबत Reconcilation मांडुन त्या तारखेअखेर शासनास देय होणारे १% शासन हमी शुल्क शासनास अदायगी करणेबाबत नस्ती ठेवणे व त्याबाबत शासनास अवगत करुन देणे.<br>११) शासनाकडुन वित्त विभागाशी संबंधित प्राप्त होणाऱ्या पत्रांबाबत कामकाज करणे.<br>१२) मा. प्रधान महालेखाकार कार्यालय यांचेकडुन प्राप्त होणाऱ्या पत्रांबाबत कामकाज करणे.<br>१३) शाखा कार्यालयांना दरमहा खर्च निधीची नस्ती सादर करणे.<br>१४) महामंडळाचे लेखे तयार झालेनंतर संचालक मंडळ सभा, संवैधानिक लेखापरिक्षण बाबत कामकाज करणे. संवैधानिक लेखापरिक्षकाकडुन लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झ ालेनंतर सदरचा अहवाल मा. प्रधान महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचेकडे पाठविण्याची कार्यवाही करणे.<br>१५) मा. प्रधान महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचेकडुन होणारे लेखापरिक्षण कालावधीत सर्व रेकॉर्ड व त्यांचे सुचनेप्रमाणे आवश्यक माहिती तयार करुन सादर करणे.<br>१६) मा. प्रधान महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचेकडुन वार्षिक सर्वसाधारण सभेस मंजुरी प्राप्त झालेनंतर वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजीत करण्यास प्रशासन विभागास टिपणी देवुन सभेसाठी वित्त विभागाचे विषय तयार करणे.<br>१७) वार्षिक सर्वसाधारण सभा झालेनंतर सदरच्या वर्षाचा मराठी व इंग्रजी अहवाल तयार करुन विधीमंडळास सादर करण्याबाबत कामकाज करणे.<br>१८) वित्त विभागातील देयके - Conveyance Bill, Toner Refilling Bill, Statutory Auditor Bill, Account Writing Bill, Ahwal Printing Bill, Tax Consultant Bill तसेच वेळोवेळी कामकाजानुसार होणाऱ्या खर्चाची देयके तयार करुन नस्ती सादर करणे.<br>१९) योजनानिहाय प्राप्त निधी, खर्च निधी व शिल्लक निधी यांचा तपशिल ठेवणे.<br>२०) वरिष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली इतर वित्त विषयक कामकाज करणे. |


Scanned with OKEN Scanner

## सन 2025
## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**कलम - ४(१)(ख)(तीन)** – शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधिकरणांतील निर्णय घेण्याच्या पक्रीयेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक कार्यालयात वरिष्ठ सहाय्यक यांचेकडून प्रथमतः उपव्यवथापक / व्यवस्थापक (प्रकल्प) यांचेकडुन संबंधितांनी सदर विषयाचे अनुषंगाने सादर केलेले कामकाज हे शासननिर्णयानुसार तपासणी करुन खात्री केली जाते व तद्नंतर विषयानुसार महाव्यवस्थापक (प्रशासन / वित्त) यांचेकडून मा.व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे संचिका सादर केल्या जातात.

आस्थापना शाखेतील ज्या संकलनाशी विषय संबंधित असेल त्याच संबंधितांचे त्या विषयाबाबत उत्तरदायित्व आहे.




Scanned with OKEN Scanner

सन 2025

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**

**कलम - ४(१)(ख)(चार) – स्वत:ची कामे पार पाडण्यासाठी त्यांच्याकडून ठरविण्यात आलेली मानके**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधिकरणांतील स्वतःची कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडुन ठरविणेत आलेली मानके वरिष्ठ सहाय्यक, लेखापाल, उपव्यवस्थापक व व्यवस्थापक (प्रकल्प) यांनी त्यांचे संकलनाशी संबंधित असणा-या कामकाजाच्या अनुषंगाने असणा-या शासन निर्णयाच्या अधीन राहुन विहीत मुदतीत कामकाज पुर्ण करणे.

Scanned with OKEN Scanner

# सन 2025
## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**कलम — ४ (१) (ख) (पाच) —** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधिकरणांतील त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारी वर्गाकडुन वापरण्यात येणारे नियम , विनियम , सुचना नियमपुस्तिका , आणि अभिलेख

| शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कामाशी संबंधीत नियम / अधिनियम | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | सुचना पत्रकानुसार दिलेले विषय | नियम व वर्ष | अभिप्राय (असल्यास) |
| १. | कंपनी कायदा १९५६ व कंपनी कायदा २०१३ | १९५६ व २०१३ | प्रस्तुत नियम अधिनियमातील तरतुदी व संबंधातील प्रचलीत शासन निर्णय नुसार कार्यवाही करण्यात येते. |
| २. | महाराष्ट्र नागरी सेवा ( वेतन) नियम | १९८१ | |
| ३. | महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपिल नियम) नियम | १९७९ | |
| ४. | महाराष्ट्र नागरी सेवा ( वर्तणुक) नियम | १९७९ | |
| ५. | महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी / स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदोन नियम) | १९८१ | |
| ६. | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम | १९८१ | |
| ७. | महाराष्ट्र नागरी सेवा ( सेवेच्या सर्वसाधारन शर्ती) नियम | १९८१ | |
| ८. | आदिवासी विकास महामंडळ कर्मचारी सेवा नियम | १९८२ | |

Scanned with OKEN Scanner

## सन 2025
## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**कलम - ४(१)(ख)(सहा)** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधिकरणांतील त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण

संबंधित संकलनाचे कामकाजाचे अनुषंगाने असणा-या सर्व प्रकारच्या नोंदवहया व संबंधित विषयाचे अनुषंगाने असणारे आवक-जावक नोंदवहया, जडवस्तूसंग्रह नोंदवहया, सेवापुस्तके, रोजकिर्द, भविष्य निर्वाह निधी नोंदवही, पगारपत्रक नोंदवही, धनादेशाबाबत नोंदवही, वैद्यकीय देयके नोंदवही, रजाविषयक नोंदवही सर्व सलग्न दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण करण्यांत येते.

Scanned with OKEN Scanner

## सन 2025
## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**कलम ४ (१) (ख) (सात)** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधिकरणांतील आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडुन निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधिकरणाने आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडुन प्राप्त होणारी निवेदने केली आस्थापना शाखेमध्ये स्विकारण्यात येत असून सदर निवेदनाचा विचार करण्यात येतो.

Scanned with OKEN Scanner

## सन 2025
## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**कलम - ४(१)(ख)(आठ)** – शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधिकरणांतील आपल्या एक भाग म्हणुन किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणुन गठीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तीच्या मिळुन बनलेल्या मंडळांचे समित्यांचे , परिषदांचे आणि अन्य निकायांचे विवरण , आणि त्या मंडळांच्या , परिषदांच्या , समित्यांच्या आणि अन्य निकषांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पाहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे संचालक मंडळाचे बैठकीचे इतिवृत्त वेळावेळी शबरी महामंडळाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांत येतात.

Scanned with OKEN Scanner

**सन 2025**

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**

**कलम - ४(१)(ख)(नऊ)** – शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधिकरणांतील अधिकारी/ कर्मचारी यांची निर्देशिका

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी पदनाम | अधिकारी/कर्मचारी यांचे नाव | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापकीय संचालक | श्रीमती लीना बनसोड | 0253-2315860 |
| २ | महाव्यवस्थापक (प्रशासन) | श्री. बाबासाहेब शिंदे | 0253-2315860 |
| ३ | महाव्यवस्थापक (वित्त) | श्री. बाबासाहेब शिंदे | 0253-2315860 |
| ४ | व्यवस्थापक (प्रकल्प) | श्रीमती सविता अतुल डुंबरे | 9325148965 |
| ५ | उपव्यवस्थापक | श्री निलेश भ.खोंडे | 9422945506 |
| ६ | लेखापाल | श्रीमती धनश्री निलेश बऱ्हाटे | 9420755715 |
| ७ | वरिष्ठ सहाय्यक | श्रीमती स्वप्नाली नितीन पाटील | 9420755731 |

Scanned with OKEN Scanner

**सन 2025**

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**

**कलम — ४ (१) (ख) (दहा)-** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक मधील प्रत्येक अधिकारी/कर्मचारी मिळणारे मासिक वेतनस्तर तसेच प्राधिकरणाच्या विनियमामध्ये तरतुद केलेप्रकरणी नुकसान भरपाई देण्याची पध्दती

---

अधिकारी व कर्मचारी यांना मिळणारी वेतनश्रेणी

| अ.क्र | अधिकारी/कर्मचारी यांचे नाव | पदनाम | वर्ग-अ, ब, क, ड | वेतनस्तर |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती लीना बनसोड | व्यवस्थापकीय संचालक | भा.प्र.से. | भा.प्र.से. |
| २ | श्री. बाबासाहेब शिंदे | महाव्यवस्थापक (प्रशासन) | अ | एस -23 67700-208700 |
| ३ | श्री. बाबासाहेब शिंदे | महाव्यवस्थापक (वित्त) | अ | एस -23 67700-208700 |
| ४ | श्रीमती सविता अतुल डुंबरे | व्यवस्थापक (प्रकल्प) | ब | एस -15 41800-132300 |
| ५ | श्री निलेश भ.खोंडे | उपव्यवस्थापक | क | एस -14 38600-122800 |
| ६ | श्रीमती धनश्री निलेश बऱ्हाटे | लेखापाल | क | एस -14 38600-122800 |
| 7 | श्रीमती स्वप्नाली नितीन पाटील | वरिष्ठ सहाय्यक | क | एस -08 25500-81100 |

Scanned with OKEN Scanner

**सन 2025**

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**

**कलम - ४(१)(ख)(अकरा)** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधीकरणातील सर्व योजनांचा तपशील , प्रस्तावित खर्च दर्शविणारा , आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमुन दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रकमांचा तपशील.

- **आर्थिक वर्ष-2024-25**

**(रु.लक्ष)**

| कार्यालयांचे नांव | लेखाशिर्ष | आर्थिक वर्ष | प्राप्त अनुदान | झालेला खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक | मागणी क्र.टी-5, मुख्य लेखाशिर्ष-2425-सहकार पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-796-जनजाती क्षेत्र उपयोजना-(01) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (1)(10) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास वित्तीय सहाय्य-(2425-1359) 36 वेतन | 2024-25 | 480.00 | 480.00 | ---- |
| | वित्तीय सहाय्य 2425-1359 (बाब क्र.33 अर्थसहाय्य) | 2024-25 | 2000.00 | 369.84 | ---- |
| | | | 2900.00 | 0 | ---- |
| | आदिवासी विभागांतर्गत रोजगारभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम 2225 D 262 (बाब क्र.31, सहायक अनुदाने (वेतनेतर)) | 2023-24 व 2024-25 | 3697.7636 | 201.13 | ---- |

Scanned with OKEN Scanner

## सन 2025
## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**कलम - ४(१)(ख)(बारा)** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधिकरणातील अर्थसाहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रित तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभार्थ्यांचा तपशील.

### १) एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना

**कर्ज योजनेचे स्वरुप-**

**अ) मुदत कर्ज योजना - (वैयक्तिक)**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i)एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा | ५% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | ५% |

सदर कर्ज योजने अंतर्गत लहान उद्योगधंदे (रु.३.०० लक्ष), कृषी संलग्न व्यवसाय (रु.२.०० लक्ष), हॉटेल ढाबा (रु.५.०० लक्ष), स्पेअर पार्ट / गॅरेज / ऑटो वर्क शॉप (रु.५ लक्ष), वाहन व्यवसाय (रु.१०.०० लक्ष) यासांरख्या योजनांसाठी अल्प व्याजदराने कर्ज वाटप करण्यांत येते.

**ब) महिला सशक्तीकरण योजना :- (वैयक्तिक)**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i) एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा | १०% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | निरंक |

सदर कर्ज योजने अंतर्गत स्थानिक पातळीवर वाव असणारे व्यवसाय तसेच लाभार्थींच्या पंसतीनुसार व्यवसायासाठी रक्कम रु.२.०० लक्ष कर्ज वाटप करण्यांत येते.

**क) स्वयंसहाय्यता बचतगट योजना-**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i)एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा | १०% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | निरंक |

सदर कर्ज योजने अंतर्गत स्थानिक पातळीवर वाव असणारे व्यवसायासाठी रक्कम रु.५.०० लक्ष कर्ज वाटप करण्यांत येते.

Scanned with OKEN Scanner

**योजनेचा उद्देश-** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत अनुसूचित जमातीतील बांधवांचे जीवनमान उंचावण्याकरीता स्वयंरोजगारासाठी कर्ज योजना राबविण्यांत येतात.

**अंमलबजावणी कार्यपद्धती-** एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना राबविणेकामी शाखा कार्यालय स्तरावर संबंधित कार्यक्षेत्रातील प्रकल्प अधिकारी हे मुल्यमापन समितीचे अध्यक्ष आहेत. सदर योजनेसाठी प्राप्त प्रस्तावानुसार शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ यांनी आयोजित केलेल्या सभेस संबंधित प्रकल्प अधिकारी उपस्थित राहून योग्य व पात्र लाभार्थीची निवड होणेकामी उपस्थित इच्छुक उमेदवारांची मुलाखत, कागदपत्र पडताळणी तसेच कर्ज परतफेड करु शकणाऱ्या लाभार्थींचा मुल्यमापन समितीचे शिफारशीने मुख्य कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यांत येतो. त्यानुसार शाखा कार्यालयाकडील संबंधित लाभार्थीचे प्राप्त प्रस्तावास मुख्य कार्यालयाकडून मंजुरी देण्यांत येते.

**कर्ज योजनांसाठी पात्रता अटी :-**

१) लाभार्थी अर्जदार आदिवासी समाजाचा असावा.
२) लाभार्थीचे वार्षिक कौटुबिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागासाठी उत्पन्नाची मर्यादा रु.३,००,०००/- इतकी आहे.
३) लाभार्थीची वयोमर्यादा सर्व योजनांसाठी १८ वर्ष ते ४५ वर्ष या दरम्यान असावी.
४) महिला सशक्तीकरण योजनेसाठी व स्वयंसहाय्यता बचतगट योजनेसाठी लाभार्थ्यांकडून कोणताही वैयक्तिक सहभाग मार्जीन मनी अपेक्षित नाही. तथापि इतर योजनांसाठी स्वतःचा हिस्सा म्हणून ५% सहभाग रक्कम घेण्यांत यावी.
५) महिला लाभार्थ्यांच्या बाबतीत जात प्रमाणपत्र नसल्यास महिलेच्या पतिचे अथवा मुला मुलींचे जात प्रमाणपत्र देखील ग्राहय धरावे.
६) रक्कम रु.५.०० लक्ष पेक्षा अधिक कर्ज योजनेसाठी एक सक्षम जामीनदार घेण्यांत यावे.

**कर्ज योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे :-**

१) तहसिल किंवा उपविभागीय कार्यालय (प्रांत) यांचा जातीचा दाखला. (फक्त आदिवासी)
२) शाळा सोडल्याचा दाखला. (वय वर्ष १८ ते ४५)
३) तहसिल कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला. (ग्रामीण व शहरी भागासाठी रु.३,००,०००/- इतके असावे.)
४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.
५) व्यवसाय प्रकल्प अहवाल संबंधित शाखा व्यवस्थापक यांनी स्वतः इच्छुक लाभार्थींना मार्गदर्शन करुन संक्षिप्त रित्या तयार करुन देणे.
६) व्यवसायासाठी लागणारे सर्व साहीत्याचे कोटेशन.
७) रेशनकार्ड छायाप्रत.
८) आधारकार्ड.
९) पॅनकार्ड असल्यास त्याची छायाप्रत.
१०) लाभार्थ्यांचे स्वतःचे बॅक खात्याचे पासबुकची छायाप्रत.
११) तीन पासपोर्ट साईज फोटो.
१२) वाहन व्यवसायासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांचे प्रचलित कायद्यानुसार परमीट वाहनासाठी आवश्यक कागदपत्रे.

Scanned with OKEN Scanner

**बचतगट / सहकारी संस्थांसाठी आवश्यक कागदपत्रे-**

१) बचतगट / सहकारी संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र.

२) बचतगट / सहकारी संस्थांचे सर्व सभासद यादी, त्यांचे रेशनकार्ड व जातीचे दाखले.

३) बचतगट / सहकारी संस्थांचे कमीत कमी सहा महिन्यांचे बँक खाते उतारा / स्टेटमेंट.

४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.

५) व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्याचे कोटेशन.

**योजनानिहाय व्याजदराचा तपशिल-**

१) महिला सशक्तीकरण कर्जावर द.सा.द.शे.४% एवढया अल्प दराने सरळ व्याज आकारले जाते.

२) रु.५ लक्ष पर्यंतचे कर्जावर द.सा.द.शे.६% सरळ व्याज आकारले जाते. तर रु.५ लक्ष ते रु.१० लक्ष पर्यंतचे कर्जास द.सा.द.शे.८% सरळ व्याज आकारणी केली जाते.

३) रु.१० लक्ष वरील कर्जास द.सा.द.शे.१०% सरळ व्याज आकारले जाईल.

| Sr. No | Perticulars | Target | Fund Received No.Units | Fund Received | Disbursed units | Fund Disbursed | Balance Unit | Balance Fund |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mahila Sabalikaran (2 lakh) | 202 | 202 | 36360000.00 | 202 | 36360000.00 | 0.00 | 0.00 |
| 2 | AGriculture & Allied Bussines (Rs.2 Lakh) | 264 | 256 | 46080000.00 | 256 | 46080000.00 | 0.00 | 0.00 |
| 3 | Hotel/Dhaba (Rs.5 Lakh) | 60 | 57 | 25650000.00 | 57 | 25650000.00 | 0.00 | 0.00 |
| 4 | Workshop/Spare Parts (Rs.5 Lakh) | 53 | 43 | 19350000.00 | 43 | 19350000.00 | 0.00 | 0.00 |
| 5 | Vehicle Scheme (Rs.10lakh) | 19 | 18 | 16200000.00 | 18 | 16200000.00 | 0.00 | 0.00 |
| 6 | Small scale Bussines (Rs.3 Lakh) | 32 | 31 | 8370000.00 | 31 | 8370000.00 | 0.00 | 0.00 |
| 7 | Self Help Group (5Lakh) | 121 | 79 | 35550000.00 | 76 | 34200000.00 | 3.00 | 1350000 |
| 8 | Bussines help for Handicap People strngthening (Electric cycle) (1 Lakh) | 17 | 1 | 90000.00 | 1 | 90000.00 | 0.00 | 0.00 |
| 9 | Passenger Vehicle (10 Lakh) | 39 | 33 | 29700000.00 | 28 | 25200000.00 | 5.00 | 4500000.00 |
| 10 | Transport Vehicle (10 Lakh) | 39 | 36 | 32400000.00 | 36 | 32400000.00 | 0.00 | 0.00 |
| 11 | Auto Rikshow (2.40 Lakh) | 45 | 31 | 6696000.00 | 21 | 4536000.00 | 10.00 | 2160000.00 |
| 12 | AVKS (10 Lakh) | 50 | 1 | 900000.00 | 1 | 900000.00 | 0.00 | 0.00 |
| | **Total** | **941** | **788** | **257346000.00** | **770** | **249336000.00** | **18.00** | **8010000.00** |

Scanned with OKEN Scanner

## २.राज्य शासनाच्या कर्ज योजना

**योजनेचे स्वरुप-**

**अ) राज्य शासन पुरस्कृत मुदत कर्ज योजना -**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i) राज्य शासन कर्ज हिस्सा | ९०% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | १०% |

सदर योजने अंतर्गत खालील योजनांचा समावेश आहे.

१) कृषी आणि संलग्न व्यवसाय (रु.५ लक्ष)
२) हॉटेल ढाबा व्यवसाय (रु.५ लक्ष)
३) वर्क शॉप / स्पेअर पार्ट (रु.५ लक्ष)
४) वाहन व्यवसाय (रु.१० लक्ष)
५) वाहन व्यवसाय (रु.१० लक्ष पेक्षा जास्त व रु.१५ लक्ष पर्यंत)
६) लघु उद्योग व्यवसाय (रु.३ लक्ष)
७) ऑटो रिक्षा / मालवाहू रिक्षा (रु.३ लक्ष)

**व्याजदर-** मुदत कर्ज योजने अंतर्गत रु.५.०० लक्ष पर्यंतच्या कर्ज योजनांसाठी ६% सरळ व्याजदर व रु.५.०० लक्ष ते रु.१५.०० लक्ष पर्यंतच्या कर्ज योजनांसाठी ८% सरळ व्याजदर राहील. सदर कर्जाची परतफेड ५ वर्षात (२० त्रैमासिक हप्त्यात) करावयाची आहे.

**ब) राज्य शासन पुरस्कृत महिला सशक्तीकरण योजना (रु.२ लक्ष):-**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i) राज्य शासन कर्ज हिस्सा | १००% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | निरंक |

**व्याजदर-** ४% सरळ व्याजदर. सदर कर्जाची परतफेड ५ वर्षात (२० त्रैमासिक हप्त्यात) करावयाची आहे.

**क) राज्य शासन पुरस्कृत स्वयंसहाय्यता बचतगट योजना (रु.५ लक्ष):-**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i) राज्य शासन कर्ज हिस्सा | १००% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | निरंक |

**व्याजदर-** ६% सरळ व्याजदर. सदर कर्जाची परतफेड ५ वर्षात (२० त्रैमासिक हप्त्यात) करावयाची आहे.

तसेच सदर याजनेसाठी आवश्यक कागदपत्रे, मुल्यमापन समिती सभा तसेच कर्ज योजना राबविण्याची कार्यवाही एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनेप्रमाणे राहील.

**योजनेचा उद्देश-** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत अनुसूचित जमातीतील बांधवांचे जीवनमान उंचावण्याकरीता स्वयंरोजगारासाठी कर्ज योजना राबविण्यांत येतात.

**अंमलबजावणी कार्यपद्धती-** सदर कर्ज योजना राबविणेकामी शाखा कार्यालय स्तरावर संबंधित कार्यक्षेत्रातील प्रकल्प अधिकारी हे मुल्यमापन समितीचे अध्यक्ष असतील. सदर योजनेसाठी प्राप्त प्रस्तावानुसार शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ यांनी आयोजित केलेल्या सभेस संबंधित प्रकल्प अधिकारी उपस्थित राहून

Scanned with OKEN Scanner

योग्य व पात्र लाभार्थीची निवड होणेकामी उपस्थित इच्छुक उमेदवारांची मुलाखत, कागदपत्र पडताळणी तसेच कर्ज परतफेड करु शकणाऱ्या लाभार्थीचा मुल्यमापन समितीचे शिफारशीने मुख्य कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यांत येईल. त्यानुसार शाखा कार्यालयाकडील संबंधित लाभार्थीचे प्राप्त प्रस्तावास मुख्य कार्यालयाकडून मंजुरी देण्यांत येईल.

| Sr.No | Perticulars | Target | Fund Received | Disbursed units | Fund Disbursed | Balance Unit | Balance Fund |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mahila Sabalikaran (2 lakh) | 225 | 45000000.00 | 213 | 42600000.00 | 12.00 | 2400000.00 |
| 2 | AGriculture & Allied Bussines (Rs.5 Lakh) | 60 | 27000000.00 | 54 | 24300000.00 | 6.00 | 2700000.00 |
| 3 | Hotel/Dhaba (Rs.5 Lakh) | 61 | 27450000.00 | 55 | 24750000.00 | 6.00 | 2700000.00 |
| 4 | Workshop/Spare Parts (Rs.5 Lakh) | 61 | 27450000.00 | 47 | 21150000.00 | 14.00 | 6300000.00 |
| 5 | Vehicle Scheme (Rs.10lakh) | 50 | 45000000.00 | 29 | 26100000.00 | 21.00 | 18900000.00 |
| 6 | Vehicle Scheme (Rs.10 lakh to 15 lakh) | 80 | 108000000.00 | 40 | 46303943.00 | 40.00 | 61696057.00 |
| 7 | Small scale Bussines (Rs.3 Lakh) | 70 | 18900000.00 | 67 | 18090000.00 | 3.00 | 810000.00 |
| 8 | Auto Rikshow (3.00 Lakh) | 60 | 16200000.00 | 15 | 4050000.00 | 45.00 | 12150000.00 |
| 9 | Self Help Group (5Lakh) | 70 | 35000000.00 | 46 | 23000000.00 | 24.00 | 12000000.00 |
|  | **Total** | **737** | **350000000.00** | **566** | **230343943.00** | **171.00** | **119656057.00** |

**3) लखपति किसान प्रकल्प –**

Tata Trusts (Collective for Livelihoods initiatives improving HH incomes through layered agriculture-based livelihoods intervention (6000 HHs, Nandurbar)

**योजनेचे स्वरूप –**

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी कुटुंबांना कृषी आधारित उपाययोजना, मृदा व जलसंधारण व सिंचनाच्या विविध पद्धती, पशुधन आधारित योजना आणि संघटन बांधणी योजना पुरविणे.

**प्रकल्प क्षेत्र:** नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील ६००० आदिवासी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न वाढविणे

**आर्थिक आर्थिक तरतूद:**

- **प्रकल्प खर्च:** १३५४.४२ लाख
- **प्राप्त निधी:** १३५४.४२ लाख
- **वितरित निधी:** १३५४.४२ लाख
- **लाभार्थी लक्षांक :** ६०००

**योजना राबविणारी यंत्रणा** –युवा मित्रा संस्था, मित्रांगण ,सिन्नर , महाराष्ट्र

**लाभ देण्यात आलेले लाभार्थी :** ४५००

Scanned with OKEN Scanner

**4) CCD NGO formation of FPO(s) in Yavatmal District**

**प्रकल्पाचे स्वरूप -**

यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा, घाटंजी, झरी जामनी तालुक्यातील १०० आदिवासी गावांमध्ये कापूस, सोयाबीन, तूर, चना ई यांची FPC यांचे मार्फत खरेदी व विक्री करणे.

**प्रकल्पाचा उद्देश** – कापूस, सोयाबीन, तूर, चना ई पिकांची मूल्य साखळी निर्मिती करणे .

**प्रकल्प क्षेत्र :**यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा, घाटंजी, झरी जामनी

**प्रकल्प कालावधी** – ५ वर्षे

**आर्थिक तरतूदः**

- **प्रकल्प खर्चः** २००० लाख
- **प्राप्त निधीः** २००० लाख
- **वितरित निधीः** ९९९.७२५ लाख
- **लाभ दिलेले लाभार्थी :** ३२९२ आदिवासी कुटुंब

**5) EAGL – Goat Rearing intervention for Katkari Tribes –**

**प्रकल्पाचे स्वरूप** -- ठाणे व रायगड जिल्ह्यातील कातकरी आदिवासींचे स्थलांतर रोखण्यासाठी त्यांना .शेळीपाळन हा उपजीविका वृद्धी प्रकल्प राबविणे

**प्रकल्पाचा उद्देश** .शेळीपालनाच्या माध्यमातून कातकरी आदिवासींचे स्थलांतर रोखणे -

**लाभार्थी लक्षांक** - १४३० आदिवासी कुटुंब

**लाभ दिलेले लाभार्थी** - १०९९ कातकरी कुटुंब

**आर्थिक तरतूदः**

- **प्रकल्प खर्चः** १०५० लाख
- **प्राप्त निधीः** ९५१.६६ लाख
- **वितरित निधीः** ८९६.३८ लाख

**6) Cage Fisheries –**

**प्रकल्पाचे स्वरूप** - आदिवासींचे मत्स्य सहकारी संस्थांना मत्स्य व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य करणे.

**प्रकल्पाचा उद्देश-** आदिवासींचे मत्स्य सहकारी संस्था /ग्रामसंघ / ग्रामसभा यांचेमार्फत मत्स्य व्यवसायाला चालना देणे.

**प्रकल्प लाभार्थी** –३३८० आदिवासी कुटुंब

**मंजूर प्रकल्प** : 10

**आर्थिक तरतूदः**

- **प्रकल्प मंजूर प्रकल्प :** ९३४.०० लाख
- **प्राप्त निधीः** ९३४.०० लाख

Scanned with OKEN Scanner

## 7) FPOs Scheme

**योजनेचे नाव** :

1. Organizing FPOs (Farmer Producer Organization) of 15000 farmers for processing, distribution, branding and retailing.
2. आदिवासी बहुल भागातील FPO/FPC/VDVK/आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, ग्राम संघ आणि इतर स्थानिक संस्थांना अर्थ सहाय्य करणे"

**योजनेचे कार्यक्षेत्र** संपूर्ण महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्र :

**योजनेचा उद्देश/हेतू :** आदिवासी शेतकरी उत्पादकांच्या शेतमालास सामुहिक विकास केंद्रांचे माध्यमातून प्रक्रिया व पॅकेजिंग करून उचित दर मिळून देणे.

**FPO ची व्याख्या-**

१) कंपनी कायदा अंतर्गत तयार झालेली आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी .FPC).

२ .महाराष्ट्र राज्याच्या सहकार कायद्यांतर्गत निर्माण झालेली आदिवासी सहकारी संस्था )Tribal cooperative).

३ केंद्रशासनाच्या कायद्यांतर्गत तयार झालेली .Multi State Tribal Co-operative.

४ .FRA कायद्याअंतर्गत काम करणाऱ्या आदिवासी ग्राम सभा व ग्राम सभांचे समूह.

५. वनधन केंद्र समूहांतर्गत स्थापन झालेले आदिवासींचे गट.

6.माविम व उमेद अंतर्गत कार्यरत असलेल्या स्वयंसहाय्यता बचतगटांचे ग्रमसंघ / फेडरेशन.

७ . ATMA अंतर्गत स्थापन झालेले शेतकरी गट.

८याव्यतिरिक्त इतर कायद्यांतर्गत किंवा इतर . विभागांतर्गत तयार झालेले आदिवासींचे गट.

**निधी वितरीत करण्याची कार्य पद्धती**

- आर्थिक अनुदान सहाय्य – 40%
- खेळते भांडवल –50% पहिले ३ वर्ष 0 %व पुढील पाच वर्ष ३ %व्याजदराने
- लाभार्थी हिस्सा – 10%

**सध्य:स्थिती**

- सध्या SCA आणि अनुच्छेद 275(1) अंतर्गत १२२ प्रकल्प मंजूर केले आहेत.
- प्रकल्प लाभार्थी-३६३००
- प्राप्त निधी -८९४७.९५
- वितरित करण्यात आलेला निधी-7768.08 लक्ष

## 8) रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम" (एकलव्य कुशल)

**योजनेचा उद्देश:**

1. आदिवासी समुदायातील उमेदवारांना स्थानिक पातळीवर रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करणे.
2. महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीतील **18** ते **45** या कार्यप्रवण वयोगटातील उमेदवारांसाठी विविध रोजगाराभिमुख कौशल विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.

Scanned with OKEN Scanner

3. सदर उमेदवारांना स्थानिक गरजा, साधनसामुग्री, परिसरातील रोजगार व स्वयंरोजगारास असलेला वाव इत्यादी बाबींशी निगडीत कौशल्य विकास प्रशिक्षण देणे.
4. आदिवासी युवक-युवतींना कौशल्य प्रदान करुन रोजगार व स्वयंरोजगारास पात्र बनविणे.
5. आदिवासी क्षेत्रालगत असलेल्या रोजगार देणा-या औद्योगिक, विविध संस्था, व्यापार संकुले व तत्सम रोजगार देणा-या यंत्रणांशी संपर्क करुन त्यांच्या गरजांवर आधारित कौशल्य विकास उपक्रम राबविणे. सदर प्रशिक्षित उमदेवारांना त्यांच्या सेवेत समावून घेणेसाठी या यंत्रणांशी संबंध विकसित करणे.
6. आदिवासी उमेदवारांकडे असलेले पारंपारिक कौशल्य आधुनिक पद्धतीनुसार विकसित करणे.
7. ज्या आदिवासी उमेदवारांकडे पूर्वज्ञान कौशल्य असेल अशा उमेदवारांना पूर्वज्ञान कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन **Recognition of Prior learning (RPL)** अंतर्गत प्रमाणित करणे.

**एकलव्य कुशल वेबपोर्टल:**

१. सदर योजनेची प्रचार प्रसिद्धी राज्यातील सर्व आदिवासी बांधवांमार्फत पोहविणे व त्यामाध्यमातुन पात्र व इच्छुक प्रशिक्षाणार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी शबरी महामंडळामार्फत एकलव्य कुशल , )**https://eklavyakushal.in/**बया वे (पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे.
२. जनजातीय गौरव दिवस दिनांक 2023 ,नोव्हेंबर 15निमित्ताने महाराष्ट्र राज्याचे आदरणीय राज्यपाल महोदय यांचे हस्ते एकलव्य कुशल वेबपोर्टलचे लोकार्पण करण्यात आले आहे.
३. सदर वेबपोर्टलवर मोठ्या प्रमाणावर उमेदवारांचा प्रतिसाद प्राप्त होत आहे ,तसेच सोशल मिडिया . वृत्त पत्र जाहिराती व प्रिंट मिडीयाच्या माध्यमातुन सदर योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांना अर्ज करणेबाबत .आवाहन करण्यात येत आहे
४. इच्छुक उमेदवारांना योजनेची अधिक माहिती देण्यासाठी तसेच योजनेचा लाभ घेण्यासाठी नाव नोंदणी करण्यासाठी येणाया- अडचणींचे निराकरण करण्यासाठी शबरी महामंडळामार्फत टोल फ्री क्रमांक- **18002335860** उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**योजनेची सद्यस्थिती:**

1. कौशल्य विकास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी च्या **Green Channel** अंतर्गत **Empanel** असणा-या प्रशिक्षण संस्थांचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत. तसेच इतर खाजगी संस्थांमार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण राबविण्यासाठी या कार्यालयामार्फत महाटेंडर प्रणालीद्वारे प्रशिक्षण संस्थांकडुन अभिव्यक्ती स्वारस्य **(Expression of Interest)** मागविण्यात आले आहेत. त्यामाध्यमातुन **38** प्रशिक्षण संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी पात्र **24** प्रशिक्षण संस्थांचे सादरीकरण पुर्ण झाले आहे. सादरीकरणाअंती **20** प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यात आली आहे.

Scanned with OKEN Scanner

2. सदर योजनेअंतर्गत माहे डिसेंबर-**2024** पासुन प्रत्येक्ष प्रशिक्षण कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली आहे.
3. सद्यस्थितीत सदर योजनअंतर्गत 2210 प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण सुरु झाले आहे.
4. सदर योजनअंतर्गत सन **2025-26** मध्ये एकुण **13800** प्रशिक्षणार्थीकरिता कौशल्य विकास प्रशिक्षण राबविणे प्रस्तावित आहे.
5. सदर योजनेकरीता सन 2023-24 व 2024-25 या आर्थिक वर्षात रु.3546.63 लक्ष निधी प्राप्त असुन आजअखेर रक्कम रु.201.1361 लक्ष निधी खर्च झा○लेला आहे.

**9) संयुक्त दायित्व गटाच्या माध्यमातून पथदर्शी दुग्ध विकास प्रकल्प –**

**योजनेचा उद्देश –**

१. दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून आदिवासी कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न वाढविणे.
२. स्थानिक बेरोजगार आदिवासींना रोजगार उपलब्ध करून देणे.
३. स्थलांतरणाचे प्रमाण कमी करणे.
४. प्रकल्प क्षेत्रातील जनावरांची गणना वाढविणे.
५. प्रकल्प क्षेत्रातील दूध उत्पादन वाढविणे.
६. उत्पादित दुधाला योग्य बाजारभाव उपलब्ध करून देणे.

**लाभार्थी निवड निकष-**

१. लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
२. लाभार्थी प्रकल्प कार्यक्षेत्राच्या तालुक्यातील असावा.
३. लाभार्थी उत्पन्न मर्यादा २.५ लाख पेक्षा कमी किंवा लाभार्थी दारिद्र रेषेखालील असावा.
४. लाभार्थी संयुक्त दायित्व गट तयार करताना व लाभार्थी सहभाग देणेसाठी कर्ज घेण्यास बँकच्या नियमाप्रमाणे पात्र असावा.
५. संयुक्त दायित्व गट असल्यास गटाच्या नावाने अर्ज करता येईल परंतु सर्व व्यक्ती गटांच्या सभासदांचे आवश्यक कागदपत्र जोडणे बंधनकारक राहील.
६. एकल महिला, दिव्यांग, आदिम जमातीच, महिला लाभार्थी यांना प्राधान्य देण्यात येईल.

**लाभार्थी निवड प्रक्रिया-**

१. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय - धुळे, नंदुरबार, कळवण, जव्हार, डहाणू यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन इच्छुक लाभार्थीचे अर्ज मागविले होते.
२. पात्र लाभार्थीच्या कागदपत्रांची छाननी करून लाभार्थीची निवड यादी व प्रतीक्षा यादी तयार करण्यात आली.
३. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी तयार केलेली लाभार्थी यादी संबंधित जिल्हा अग्रणी बँक यांना संयुक्त दायित्व गट स्थापन करणेसाठी सादर करण्यात आलेली आहे .
४. जिल्हा अग्रणी बँकेकडून गावनिहाय लाभार्थ्यांची यादी विचारात घेऊन व लाभार्थीचे बँक खाते ज्या बँकेत आहे अश्या बँकांना ५ लाभार्थीचा एक गट या प्रमाणे संयुक्त दायित्व गट स्थापन करणेसाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.
५. जिल्हा अग्रणी बँक लाभार्थ्यांना स्वतःचा लाभार्थी हिस्सा उपलब्ध करून देणेसाठी बँक कर्ज मंजूरी साठीचा प्रस्ताव संबंधित बँकांना पाठवेल.
६. जिल्हा अग्रणी बँक तयार झालेल्या अंतिम सर्व संयुक्त दायित्व गटांची यादी सादर करेल .
७. लाभार्थी संख्या कमी पडल्यास प्रतीक्षा यादी मधील लाभार्थी क्रमवारी नुसार घेतले जातील.

Scanned with OKEN Scanner

**निधी वितरण स्थिती-**

**Phase 1-**

| अ. क्र. | प्रकल्प कार्यालय | जिल्हा | संयुक्त दायित्व गट लक्ष | संयुक्त दायित्व गट निधी मागणी | संयुक्त दायित्व गट निधी वितरित | निधी वितरित रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | नंदुरबार | नंदुरबार | १००० | ५०१ | ५४५ | ३४७२.८४९ |
| २. | धुळे | धुळे | ४०० | ११६ | ६८ | ४३३.३०९६ |
| ३. | कळवण | नाशिक | ६०० | ४६९ | ४६८ | २९८२.१८९६ |
| ४. | जव्हार | पालघर | ३८९ | ० | ० | ० |
| ५. | डहाणू, तलासरी | पालघर | १११ | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **२५००** | **१०८६** | **९९०** | **६८८८.३४८२** |

**Phase 2 –**

| अ. क्र. | प्रकल्प कार्यालय | जिल्हा | संयुक्त दायित्व गट लक्ष | संयुक्त दायित्व गट निधी मागणी | संयुक्त दायित्व गट निधी वितरित | निधी वितरित रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | नंदुरबार | नंदुरबार | ४०० | ० | ० | |
| २. | नंदुरबार | नवापुर | ४०० | ५४९ | ५४९ | ३४९८.३३७८ |
| ३. | धुळे | शिरपूर | ३०० | ० | ० | |
| ४. | तळोदा | तळोदा | १०० | १९ | १९ | १२१.०७१८ |
| ५. | तळोदा | अक्कलकुवा | ३०० | ५ | ५ | ३१.८६१ |
| | तळोदा | धडगाव | ३०० | ० | ० | |
| | कळवण | बागलाण | ६० | ० | ० | |
| | नाशिक | इगतपुरी | ६० | ० | ० | |
| | | | १९२० | ५७३ | ५७३ | |
| | | **एकूण** | **२५००** | **९९०** | **९९०** | **३६५१.२७१** |

## 10) प्रधानमंत्री वनधन विकास योजना

प्रधानमंत्री वनधन विकास योजना ही केंद्रशासनाने पुरस्कृत केलेली योजना आहे. आदिवासी विकास विभाग , मंत्रालय महाराष्ट्र शासन हे राज्य नोडल विभाग तर शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या .नाशिक , महाराष्ट्र राज्य ,या योजनेची अंमलबजावणी करणारी राज्य अभिकर्ता संस्था असुन "ट्रायफेड" कार्यालय मुंबई या योजनेचे मार्गदर्शक संस्था म्हणुन काम करीत आहे. ट्रायफेड कार्यालय व आदिवासी विकास विभाग सह शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या नाशिक यांच्या समन्वयाने राज्यात सदरची योजना प्रभावी पणे राबविली जात आहे. ट्रायफेड कार्यालय यांनी या विभागाच्या अंतर्गत पहिल्या टप्पयात ६४ वनधन केंद्र व दुस-या टप्पयात २०० वनधन केंद्र असे एकुण २६४ वनधन केंद्राना मंजुरी दिलेली असुन या विभागाच्या वतीने सदरच्या वनधन केंद्राना निधी वितरीत केलेला असुन सदरचे वनधन केंद्र आज सक्षमपणे कार्यरत आहे.

PMJANMAN योजनेनेंतर्गत महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात एकूण ४० आदिम जमितीतील वन धन केंद्रांना मंजुरी प्राप्त झालेली आहे .

Scanned with OKEN Scanner

जंगलात उत्पादित होणा-या गौणवन उपजावर आदिवासींचे परंपरागत ज्ञानाचा, कौशल्याचा तसेच त्यासोबत आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करुन गौणवनउपजावर प्रक्रिया करणे व त्याचे मुल्यसंवर्धन करुन त्याची विक्री करणे त्यामुळे आदिवासीचे जिवनमान उंचावणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**योजने विषयी**

- प्रधामंत्री वनधन विकास योजना राबविण्यासाठी आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई हे नोडल संस्था (Nodel Agency) म्हणुन राहील.
- ही योजना राबविण्यासाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ हे राज्य अभिकर्ता संस्था (State Implementing Agency) म्हणुन कार्य करेल.
- २० लाभार्थ्यांचा एक वनधन केंद्र (स्वंयसहायता गट) असे १५ वनधन केंद्र (स्वंयसहायता गट) मिळुन एकुण ३०० लाभार्थ्यांचे एक वनधन केंद्र समुह तयार होते.
- वनधन केंद्र समुहामधील लाभार्थ्यांपैकी कमीतकमी ८०% लाभार्थी हे अनुसुचित जमातीचे असले पाहिजे.
- ट्रायफेड नवी दिल्ली यांचेमार्फत २६५ वनधन विकास केंद्राना मंजुरी देण्यात आलेली आहे.
- आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक:एमएफपी-2020/प्र.क्र.30/का.3,दि.03.11.2023 अन्वये पुन:श्च प्रधानमंत्री वनधन विकास योजनेची प्रभावीपणे अमंलबजावणी होणेकामी आदिवासी विकास आयुक्तालय,नाशिक यांच्याऐवजी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या,नाशिक यांची राज्य अभिकर्ता (SIP)म्हणुन नियुक्ती करण्यात आली.

**महाराष्ट्रातील वनधन केंद्राचा जिल्हानिहाय तपशील**

| अ.क्र. | जिल्हा | पहिल्या टप्प्यातील मंजुर वनधन केंद्र समुह | दुस-या टप्प्यातील मंजुर वनधन केंद्र समुह | तिसरा टप्प्यातील नव्याने मंजुर वनधन केंद्र समुह | एकुण वनधन केंद्र समुह |
|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | ५ | ५ | ० | १० |
| २ | नांदेड | १ | ० | ० | १ |
| ३ | रायगड | ३ | १५ | ० | १८ |
| ४ | वाशिम | ४ | ० | ० | ४ |
| ५ | यवतमाळ | ९ | ९८ | ० | १०७ |
| ६ | चंद्रपुर | ७ | ९ | ० | १६ |
| ७ | धुळे | ४ | ० | ० | ४ |
| ८ | गडचिरोली | १० | २ | ० | १२ |
| ९ | नंदुरबार | ५ | १ | ० | ६ |
| १० | नाशिक | ३ | २ | १ | ६ |
| ११ | पुणे | १० | ४ | ० | १४ |
| १२ | . ठाणे | १ | २६ | ० | २७ |
| १३ | जळगाव | २ | ० | ० | २ |
| १४ | अमरावती | ० | २० | ० | २० |
| १५ | भंडारा | ० | ४ | ० | ४ |
| १६ | पालघर | ० | ५ | ० | ५ |
| १७ | रत्नागिरी | ० | ९ | ० | ९ |
| | **एकुण:-** | **६४** | **२००** | **१** | **२६५** |

Scanned with OKEN Scanner

- भारतीय जनजाती सहकारी विपणन विकास संघ (ट्रायफेड) नवी दिल्ली यांनी 64 वनधन केंद्राना प्रत्येकी रु.15/- लक्ष प्रमाणे रु.9.60/- कोटी तसेच Advocacy Workshop & Setting of Model demo VDVK Units साठी रु.9.75/- लक्ष व योजनेच्या प्रसिध्दीसाठी रु.5/- लक्ष येवढा तसेच दुस-या टप्प्यातील मंजुर 200 वनधन केंद्रासाठी मंजुर 30/- कोटी,पैकी रु.15/-कोटी असा एकुण रु.24,74,75000/-निधी तसेच रु.7,50,000/- नव्याने मंजुर एका वनधन विकास केंद्रासाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक यांना उपलब्ध करुन दिलेला आहे.

**वनधन केंद्र समुहाकरिता प्राप्त व वितरित निधीचा तपशिल**

(रक्कम रु.कोटीत)

| अ.क्र. | मंजुर वनधन केंद्र समुह | लाभार्थी संख्या | मंजुर निधी | प्राप्त निधी | वितरित केलेले वनधन केंद्र समुह संख्या | वनधन केंद्र समुहांना वितरित केलेला एकुण निधी | कार्यान्वित वनधन केंद्र समुह संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २६५ | ७९५०० | ३९.७५ | २४.६७५ | १३० | ९.९३ | ६४ |

- १३० वनधन केंद्र समुहांना त्यांचे व्यवसाय आराखडयाचे अवलोकन करुन प्रशिक्षण,साहित्य खरेदी व सक्षमीकरणासाठी इ. बाबीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
- २६५ मंजुर वनधन केंद्र समुहा पैकी १८१ वनधन केंद्र समुहाचे बँक खाते उघडण्यात आलेले आहे.
- १८१ वनधन केंद्र समुहानी त्यांचे स्तरावर बोर्ड व बॅनर तयार केलेले आहेत.
- १८० वनधन केंद्र समुहाच्या लाभार्थ्यांचा सर्वे पुर्ण करण्यात आलेला आहे.
- १८० वनधन केंद्र समुहांनी व्यवसाय आराखडे तयार केलेले आहेत.
- टाटा इंन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांचेमार्फत २८ वनधन केंद्राना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## ११) PM JANMAN योजना-

- केंद्र शासनमार्फत आदिम जमाती विकास योजने अंतर्गत प्रधानमंत्री जनमन (PM JANMAN) योजना राबविण्यात येत आहे. ट्रायफेड नवी दिल्ली शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक यांचे मार्फत प्रथम व दुस-या टप्प्यात महाराष्ट्र राज्याचे एकुण ४० PVTG वनधन केंद्राचे प्रस्ताव सादर करण्यात आलेत त्यास ट्रायफेड नवी दिल्ली यांनी मंजुरी दिलेली असुन त्याअन्वये (प्रति लाभार्थी- रु.५०००/-) प्रमाणे **रक्कम रु.१८१.२०/-** लक्ष पैकी **रक्कम रु.९०.६०/- लक्ष ५०%** निधी उपलब्ध करुन दिलेला होता. त्याअन्वये ४० PVTGs वनधन केंद्राना तो वितरीत करण्यात आलेला आहे.
- ४० वनधन केंद्रातील मास्टर ट्रेनर यांना EAP /EDP तसेच ESDP चे प्रशिक्षण देणेकामी NIESBUD व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ यांचेसमवेत व्दिपक्षीय (BiParty Agreement) करारनामा करण्यात आलेला आहे.
- दि.२७.०६.२०२४ ते २९.०६.२०२४ रोजी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या,मुख्यकार्यालय नाशिक येथे NIESBUD यांचेमार्फत ५८ मास्टर ट्रेनर यांना EAP /EDP तसेच ESDP चे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.NIESBUD यांनी दिलेल्या EAP /EDP तसेच ESDP चे कार्यक्रमानुसार आज अखेर ४० PVTGs वनधन केंद्राचे खालील तपशीलाप्रमाणे EAP /EDP तसेच ESDP झालेले असुन त्याअन्वये ४० वनधन केंद्र कार्यान्वीत झालेले आहेत.

Scanned with OKEN Scanner

| एकुण PVTGs लाभार्थी संख्या | EAP | EDP | ESDP अंतर्गत ४० वनधन केंद्राचे एकुण लाभार्थी संख्या | व्यवसाय आराखडा वनधन केंद्र संख्या | मशनरी सेट-अप वनधन केंद्र संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ३६२४ | ३६२४ | ३६२४ | २८१२ | ४० | ४० |

१) पेरसापेण वनधन विकास केंद्र वाघदरा ता.मारेगाव जि.यवतमाळ-मोहा लाडु .
२) सावित्री वनधन विकास केंद्र खंदाणी ता.मारेगाव जि.यवतमाळ -मसाले (हळद पावडर, मिरची पावडर व धना पावडर), मोहा रेझीन्स्
३) देवराई वनधन विकास केंद्र भामरागड जि.गडचिरोली-डोकरा आर्ट.
४) जिजामाता वनधन विकास केंद्र सालेभट्टी ता-मारेगाव जि.यवतमाळ-मध.
५) कपिलधारा वनधन विकास केंद्र कवनई ता-इगतपुरी, जि-नाशिक-नागलीचे पदार्थ, आवला कँन्डी, नागली पिठ.

- केंद्रशासनाचे Skill Indiaच्या सिध्द पोर्टलवर ४० PVTGs वनधन केंद्राचे रजिस्ट्रेशन झाले असुन त्याअन्वये त्यांना प्रशिक्षण केंद्र म्हणुन मान्यता मिळाली असुन प्रशिक्षणाची कार्यवाही सुरु आहे.

**12.शबरी आदि पर्यटन योजना-**

- योजनेचे नांव " Shabari Aadi-Paryatan Yojana (Shabari Tribal Tourism Program)
- योजनेचे प्रस्तावित लाभक्षेत्र: महाराष्ट्र राज्यातील निवडक २५ पर्यटनक्षम गावे.
- वित्तीय तरतुद रु. लाखात-

| घटक | प्रत्येक गावासाठी निधी (₹ लाख) |
|---|---|
| नवीन होम स्टे बांधकाम (१० होम स्टे, प्रत्येकी ५ लक्ष) | ५०.०० |
| ग्राम पर्यटन समितीचे निधी | ५.०० |

सदर योजनेकरिता रक्कम रु.५५ लक्ष इतका निधी आर्थिक अनुदान सहाय्य इतकी वित्तीय तरतूद २७५ (१अ) अंतर्गत आदिवासी विकास मंत्रालय यांच्या मार्फत मंजूर करण्यात आलेली आहे.

- योजनेचा उद्देश हेतु:

शबरी महामंडळाद्वारे स्थानिक समुदाय सहभाग आणि प्रकल्प सहाय्यक संस्था (PSO) यांच्या सहकार्याने ग्रामीण पर्यटनास चालना दिली जात आहे. त्यासाठी अशा पर्यटन स्थळांची निवड केली जाते जिथे जवळच्या गावांमध्ये पर्यटनाशी संबंधित व्यवसाय वाढवण्याची शक्यता असते. ग्रामीण पर्यटनामध्ये स्थानिक प्रेक्षणीय स्थळांची सफर, सुलभ निवास व्यवस्था, स्थानिक आदिवासी संस्कृतीला अनुरूप भोजन, सांस्कृतिक अनुभव, कला व हस्तकला विकास आणि स्थानिक कुटुंबांचे क्षमतेचे संवर्धन या सहा मुख्य घटकांवर आधारित उपक्रम राबवले जातात. होमस्टे तयार झाल्यानंतर देशी आणि विदेशी

Scanned with OKEN Scanner

पर्यटक या गावांना भेट देतील, जिथे त्यांना गावाची संस्कृती, चविष्ट भोजन, लोककला आणि परंपरा अनुभवता येतील. त्यामुळे गावात रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि तरुणांना आपल्या गावातच उपजीविका मिळेल. होमस्टे चालक, सांस्कृतिक गट, स्थानिक दुकानदार, फळभाजी विक्रेते, दुग्ध उत्पादक, हस्तकलावंत, छायाचित्रकार अशा विविध घटकांना रोजगार मिळेल. ग्रामीण पर्यटन केवळ एक अनोखा अनुभव न देता स्थानिक रोजगारही वाढवेल, हेच या प्रकल्पाचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

- पर्यटन अनुभव: पर्यटकांना आदिवासी जीवनशैलीचा अनुभव देणे.
- आर्थिक विकास: पर्यटनाद्वारे उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण करणे.
- संस्कृती संवर्धन: आदिवासी कला, संगीत, नृत्य, आणि हस्तकलेचा प्रचार करणे.
- पर्यावरणपूरक विकास: शाश्वत पद्धतींचा अवलंब करून पर्यावरणाचे रक्षण करणे.

Scanned with OKEN Scanner

**सन 2025**

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**

**कलम - ४(१)(ख)(तेरा)** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्रधीकरणातील ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील

**-----निरंक ---------**

Scanned with OKEN Scanner

**सन 2025**
**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**

**कलम - ४(१)(ख)(चौदा)** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्राधिकारणातील इलेक्ट्रॉनिक स्वरुपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे संकेतस्थळ www.mahashabari.in यावर शबरी महामंडळाची माहिती तसेच महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजनांची माहिती उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. सदर संकेतस्थळावर महामंडळाचे संचालक मंडळ, प्रशासकीय संरचना, महत्वाचे शासन निर्णय, सांमजस्य करार, वार्षिक अहवाल, संचालक मंडळ इतिवृत्त, नागरीकांची सनद, सेवा अधिकार कायदा व महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजनांविषयी विस्तृत माहीती प्रसिद्ध करण्यांत आलेली आहे.

Scanned with OKEN Scanner

**सन 2025**

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**

**कलम - ४(१)(ख)(पंधरा)** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्रधीकरणातील माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणा-या सुविधांचा तपशील तसेच कार्यालयाकडील ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे संकेतस्थळ www.mahashabari.in यावर शबरी महामंडळाची माहिती तसेच महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजनांची माहिती उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

सदर संकेतस्थळाच्या माध्यमातून एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना व राज्य शासन पुरस्कृत कर्ज योजनांसाठी ऑनलाईन कर्ज वितरण प्रणाली https://loan.mahashabari.in/ विकसित करण्यांत आली आहे.

राज्यातील FPOs यांना मुल्यसाखळी आधारीत प्रकल्पांसाठी अर्थसहाय्य करुन त्यांची माहिती अद्यावत करणेसाठी https://fpo.mahashabari.in/ हे पोर्टल विकासित करण्यांत आले आहे.

FPO व वनधन यांचे उत्पादित मालाची विपणन करणेसाठी शबरी नॅचरल्स ब्रँड विकासत करुन www.shabarinaturals.com व हे ऑनलाईन ई-कॉमर्स पोर्टल कार्यान्वित करण्यांत आले आहे.

तसेच एकलव्य कुशल कौशल्य विकास योजने अंतर्गत लाभार्थी निवडी करीता https://eklavyakushal.in/ ही स्वतंत्र ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यांत आली आहे.

Scanned with OKEN Scanner

## सन 2025
## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**कलम - ४(१)(ख)(सोळा)** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक या सार्वजनिक प्रधीकरणातील जन माहिती अधिका-यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील

माहिती अधिकार अधिनियम, २००५, कलम ५(१) व १९ (१) अन्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक येथील माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी

| अ.क्र. | कार्यालय | सहायक शासकीय माहिती अधिकारी | शासकीय जनमाहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यालय, नाशिक | १.उपव्यवस्थापक<br>२.वरिष्ठ सहाय्यक<br>३.लेखापाल | व्यवस्थापक (प्रकल्प) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक | मा.महाव्यवस्थापक (प्रशासन) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक |
| २ | शाखा कार्यालय नाशिक, जव्हार, जुन्नर, देवरी, किनवट, नंदूरबार, यवतमाळ, यावल, धारणी, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली. | लेखापाल | शाखा व्यवस्थापक (संबंधित शाखा कार्यालय) | मा.महाव्यवस्थापक (प्रशासन) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक |

Scanned with OKEN Scanner

सन 2025

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक**

**कलम - ४(१)(ख)(सतरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती प्रसिध्द करील आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशने अदयावत करील.**

---

विहीत करण्यात येईल अशी इतर माहिती प्रसिध्द करण्यात येईल आणि त्यानंतर ती माहिती शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडून दरवर्षी अद्यावत करण्यात येईल.

**(लीना बनसोड, भा.प्र.से)**
व्यवस्थापकीय संचालक
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,
नाशिक

Scanned with OKEN Scanner